THE YASH ACADEMY™

# राज्यकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा

## पेपर क्रमांक – 2

## SUBJECTWISE QUESTION SET

## 2019

**Address :**

**3rd Floor, Moonlight Building, Opp.**

**Sitabuldi Police Station, Sitabuldi Nagpur**

**Mob. 7447777799 / 8381077258 / 07122956053**

# राज्यकर निरीक्षक, गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा

## अभ्यासक्रम -SYLLABUS

**पेपर क्रमांक - 1 मराठी व इंग्रजी**

**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.

**इंग्रजी :-** Common Vocabulary, Sentence structure, Grammer, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

**सामान्य ज्ञान:-**

**1. चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील**

**2. माहिती अधिकार अधिनियम - 2005, व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015**

**3. संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांचा माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न, त्यांचे भवितव्य.

**पेपर क्रमांक - 2**

**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान : या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

1 **बुद्धीमत्ता चाचणी**

2 **महाराष्ट्राचा भूगोल -** महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, Climate, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश्न

3 **महाराष्ट्राचा इतिहास -** सामाजिक व आर्थिक जागृती (1885 - 1947), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.

4 **भारतीय राज्यघटना -** घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे -शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका. राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ - विधानसभा, विधानपरीषद व त्याचे सदस्य, औधकार, कार्य व Role, विधी समीत्या.

5 **नियोजन -** प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, 73 व 74 वी घटना दुरूस्ती, भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रूपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील

आव्हाने, गरीबी,बेरोजगारी अणि प्रादेशिक असमतोल.

6 **शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास** – पायाभूत सुविधांचा गरज आणि महत्व, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचा विकास आणि वाढ - जसे ऊर्जा, पाणीपुरवठा व मलनिःसारण, गृह, परिवहन (रस्ते, बंदर इत्यादी) दळणवळण (पोस्ट व तार, दूरसंचार) रेडिओ, टि.व्ही. इंटरनेट क्रायसिस, भारतातील इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रश्न व या संबंधीचे धोरण व त्यावरील पर्याय; खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी, एफ.डी. आय आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे खाजगीकरण, राज्य व केंद्र सरकारचे इन्फ्रास्ट्रक्चर विकासाचे धोरण, ग्रामीण व शहरी भागातील परिवहन व गृह या विषयीचे प्रश्न त्यावरील केंद्र व राज्य सरकारचे कार्यक्रम व उपक्रमशिलता.

7 **आर्थिक सुधारणा व कायदे** – पार्श्वभूमी, उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण संकल्पना व त्याचा अर्थ आणि व्याप्ती, मर्यादा, केंद्र व राज्य स्तरावरील आर्थिक सुधारणा, WTO, तरतुदी आणि सुधारणा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील अपेक्षित परिणाम, प्रश्न व समस्या, GST. विक्रीकर, VAT, WTO, इत्यादीशी संबंधीत कायदे/नियम.

8 **आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवल चळवळ** – जागतिकीकरणाच्या युगातील सूत्र व कल, वाढ, रचना आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची दिशा, भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धोरण, निर्यातीतील वाढ, WTO आणि आंतरराष्ट्रीय व्यापार विदेशी भांडवलाचा अंतप्रवाह, रचना व वाढ, FDI व्यापार, बहुआंतरराष्ट्रीय भांडवल पुरविणाऱ्या संस्था, IMF जागतिक बँक, IDA इंटरनॅशनल क्रेडीट रेटींग.

9 **सार्वजनिक वित्त व्यवस्था** – महसुलाचे साधन, टॅक्स, नॉनटॅक्स, भारतातील केंद्र व राज्यातील सार्वजनिक ऋण, केंद्र व राज्याची सार्वजनिक खर्च वाढ, सार्वजनिक खर्च सुधारणा कामावर आधारित अर्थसंकल्प, शुन्याधारित अर्थसंकल्प, भारतातील करसुधारणा आढावा, राज्य पातळीवरील करसुधारणा VAT सार्वजनिक ऋण वाढ, रचना आणि भार, राज्याची कर्जबाजारीपणाची केंद्राला समस्या, राजकोषीय तुट, संकल्पना, तुटीचे नियंत्रण, केंद्र राज्य व रिझर्व्ह बँकेचे उपक्रम, भारतातील राजकोषीय सुधारणा, केंद्र व राज्यस्तरावरील आढावा.

## राज्यकर निरीक्षक मुख्य परीक्षा (पेपर – 2)
### PAPER ANALYSIS - SUBJECTWISE

| विषय | वर्ष (2019) |
|---|---|
| चालू घडामोडी व इतर घटक [CURRENT AFFAIRS] | --- |
| बुद्धीमत्ता चाचणी [REASONING] | 15 |
| भूगोल [GEOGRAPHY] | 10 |
| इतिहास [HISTORY] | 10 |
| भारतीय राज्यघटना [INDIAN POLITY] | 10 |
| माहिती अधिकार अधिनियम - 2005 [RTI ACT -2005] | --- |
| संगणक व माहिती तंत्रज्ञान [COMPUTER & IT] | --- |
| नियोजन [PLANNING] | 10 |
| शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास [INFRASTRUCTURE] | 10 |
| आर्थिक सुधारणा व कायदे [ECONOMIC REFORMS & ACTS] | 10 |
| आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवल चळवळ [INTERNATIONAL] | 10 |
| सार्वजनिक वित्त व्यवस्था [PUBLIC FINANCE SYSTEM] | 15 |
| | **100** |

* 2017 च्या बदलेल्या अभ्यासक्रमानुसार, चालू घडामोडी, माहिती अधिकार अधिनियम - 2005 व संगणक व माहिती तंत्रज्ञान हे घटक पेपर क्रमांक 1 मध्ये समाविष्ट केले आहे.

# विक्रिकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा - 2019

| परीक्षा दिनांक : 24-08-2019<br>वेळ : 1 तास | पेपर २ सामान्य ज्ञान, बुद्धिमापन व विषयाचे ज्ञान | एकूण प्रश्न : 100<br>एकूण गुण : 100 |
|---|---|---|

## बुद्धीमत्ता चाचणी

1. a + b म्हणजे a ही b ची मुलगी.
a - b म्हणजे a हा b चा नवरा.
a × b म्हणजे a हा b चा भाऊ.
जर p + q × r + s × t + u × v, तर v च्या सध्याच्या पिढीचा क्रम निवडा.
पर्यायी उत्तरे :
1) 2 री 2) 3 री 3) 1 ली व सर्वात वडील पिढी 4) 4 थी

---

2. वर्णाक्षरांच्या LEFGHI या गटापासून टोकला L व I ही अक्षरे असलेल्या विविध वर्णाक्षर गटांची संख्या निवडा.
1) 4! 2) 3! × 2! 3) 2! 4) 4! × 2!

---

3. 9 या संख्येने D6D41 या पाच अंकी संख्येला निःशेष भाग जातो. दिलेल्या अट पूर्ण करणाऱ्या या संख्येतील अंकांची किमान बेरीज दिलेल्या पर्यायातून निवडा.
1) 54 2) 27 3) 36 4) 63

---

4. अमनने 300 किमी प्रवास रेल्वेने आणि 200 किमी प्रवास टॅक्सीनी केला. त्याला या प्रवासाला 5 तास 30 मिनिटे लागली. जर त्याने 260 किमी प्रवास रेल्वेने आणि 240 किमी टॅक्सीने केला असता तर त्याला 6 मिनिटे जास्तीचा वेळ लागला असता. तर रेल्वेची ताशी गती शोधा.
1) 100 किमी 2) 120 किमी 3) 80 किमी 4) 110 किमी

---

5. शाहीद शाळेत जाण्यासाठी तो 100 मीटर दक्षिनेकडे गेला. तेथून तो डावीकडे वळून 200 मीटर गेला; पुन्हा तो डावीकडे वळून 100 मीटर अंतरावरील मित्राकडे गेला. तेथून मित्रासह तो पूर्वेकडे 400 मीटर अंतर चालुन शाळेजवळ गेला. तर घर व शाळा यामणील अंतर किती व शाळा घराच्या कोणत्या दिशेला आहे ?
1) 400 मीटर पूर्वेकडे 2) 600 मीटर पूर्वेकडे 3) 600 मीटर पश्चिमेकडे 4) 400 मीटर पश्चिमेकडे

---

6. डावीकडील पारदर्शक कागदाच्या पानाची तुटक रेषांवरून घडी घातली आणि लहान एकेरी त्रिकोण मिळवला. दिलेल्या पर्यायांतून सर्वात योग्य घडी निवडा.



1)  2)  3)  4) 

---

7. जर B5D म्हणजे B हे D चे वडिल आहेत.
B9Dम्हणजे B ही D ची बहीन आहे.

B4Dम्हणजे B हा D चा भाऊ आहे.
B3Dम्हणजे B ही D ची बायको आहे.
यावरून F ही K ची आई आहे, हे दर्शवणारा पर्याय निवडा.
1) F3M5K 2) F5M3K 3) F9M4N3K 4) F3M5N3K

---

8. ''भारतात बनवा'' या अभियानासंदर्भात लेखकाणे नोंदविलेले निरीक्षण अभ्यासा .
भारताला औद्योगिक - उत्कर्षापर्यत नेणाऱ्या नवोपक्रमांचा इतिहास नाही. भारत हा विनीमय करणारा देश आहे तसेच मानवी (क्षमताच) मोजपट्टी आहे अशा नाजुक कारागिरीच्या आणि काळजी वाहण्याच्या क्षेत्रात तो उत्तम कामगीरी पार पाडू शकतो. हा देश सेवा पूरवण्यात देखील चांगली कामगीरी करतो. चागले कायदे, आमिषे आणि तंत्रज्ञान, पर्यटन आतिथ्य, अर्थतंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय शिक्षण, आरोग्य सेवा - म्हणजेच ज्या क्षेत्रात माणसाचे असणे अजुनही महत्वाचे आहे. जेथे व्यक्तीगत अवधान महत्वपूण्र ठरते आणि यंत्रे व मोजणी साधने तुलनेने कमी महत्वाची आहे अशा क्षेत्रात तो चांगली कामगिरी करू शकेल.
वरील माहितीच्या संदर्भात उचित अर्थनिर्वचन /ने निवडा.
अ. औद्योगिक - उत्कर्षापर्यत नेणाऱ्या नवोपक्रमांचा इतिहास नसल्याने ''भारतात बनवा'' हे अभियान यशस्वी होणार नाही.
ब. भारत सेवा पुरवण्यात चांगले काम करत असल्यामुळे त्याने पर्यटन आतिथ्य, अर्थतंत्रज्ञान, आरोग्य सेवा इत्यादी क्षेत्रे विकसित करण्याकडे प्रयत्न एकवटायला हवेत.
क. उद्योगांची उभारणी करण्यात वेळ, पैसा व जमीन वाया घालविण्यापेक्षा भारताने चांगले कायदे, आमिषे, आणि तंत्रज्ञान यांचा वापर सेवा क्षेत्रे विकसित करण्यात केला पाहिजे.
ड. जेथे यंत्रे व मोजमापे फारशी महत्वाची नसतात आणि व्यक्तीगत अवधनाला महत्व असते अशा क्षेत्रात भारत चांगली कामगिरी करू शकतो.
पर्यायी उत्तरे :
1) क खेरीज सर्व 2) फक्त ब व क 3) फक्त ब व ड 4) ड खेरीज सर्व

---

9. अनेक आहारतज्ज्ञ दावा करतात की पाव खाने आरोग्यासाठी चांगले नाही कारण त्यात पचनासाठी आवश्यक असे तंतू नसतात.
आहीरतज्ज्ञाच्या या म्हणण्याचे विरोधक म्हणतात की परीक्षणानूसार पाव खाणारी पिढी त्यांच्या पालकांपेक्षा पोषणाबाबत कमी अभव ग्रस्त आहे.
जर सत्य असेल, तर विरोधकांच्या दृष्टीकोणाची पुष्टी करणारे विधान निवडा.
1) पाव खाणाऱ्या पिढीचे पालक न्याहारित नेहमी ताजे व घरी बनवलेले अन्न खात.
2) पाव खाणाऱ्या पिढीच्या पालकांना त्यांच्या काळात अन्नाच्या कमतरतेमुळे पूरेसे अन्न मिळू शकत नव्हते.
3) पाव खाणाऱ्या पिढीच्या पालकांना गरीबी मुळे पूरेसे अन्न खायला मिळत नव्हते.
4) भूक लागली असताना पावा सारखे कमी किमतीचे, कोठेही सहजपणे मिळणारे सोईचे अन्न हे व्यक्तीसाठी महत्वाचे आहे.

---

10. खालील आलेखाचा व तक्ताचा काळजीपूर्वक अभ्यास करा व त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या.
सात राज्यांतील स्पर्धात्मक परिक्षेमध्ये उपस्थित होणाऱ्या उमेदवारांचे वर्गीकरण.एकूण उपस्थित उमेदवार = 3 ला




राज्यानूसार टक्के वारी आणि पुरूष व महिला पात्र उमेदवारांचे गुणोत्तर.

| राज्य | राज्यातून उपस्थित असणाऱ्या पात्र उमेदवारांची टक्केवारी | पात्र उमेदवारांचे गुणोत्तर |
|---|---|---|
| A | 49 | 4 : 5 |
| B | 61 | 6 : 4 |
| C | 54 | 7 : 8 |
| D | 45 | 3 : 2 |
| E | 65 | 7 : 6 |
| F | 57 | 11 : 8 |
| G | 48 | 9 : 11 |

राज्य मधुन पात्र असणाऱ्या पुरूष उमेदवारांची संख्या किती आहे?

1) 4536  2) 4568  3) 5454  4) 5544

---

11. नदीचे खोरे हे जमीन व समुद्र या दरम्यानचा लोकांना वाहतूकीचे रस्ते उपलब्ध करणारा, माशांना सागरी व गोडया जल प्रणाली दरम्यान स्थालांतरण करणे शक्य करणारा कळीचे दुवा असतो. सुव्यवस्थापित नदी खोरी पाण्याचे शुद्धाकरण होणे, त्याचे जमिनीत जिरणे व पुरांमुळे पाण्याला येणाऱ्या फुगवटयाचे नियंत्रण यासाठी लागणाऱ्या ''गाळण्या'' व ''शोषक'' म्हणून महत्वाची भूमिका पार पाडतात. जगातील विविध भागात नद्यांना येणारे मोसमी पूर हे आजपर्यंत कुरणांचा व शेतीजमिनीची सुपिकता टीकवण्यासाठी महत्वाचे ठरले आहे.

वरील परिच्छेदाच्या आधारे काढता न येणारे अनूमान निवडा.

1) नदीचे खोरे हे जमीन व सागर यांना जोडणारा महत्वाचा भूभाग आहे.
2) नदीचे खोरे हा जलशुद्धीकरणाला मदत करणारा तिचा अविभाज्य भाग आहे.
3) नदीचा वाहतुकीसीठी उपयोग करणे हा तिच्या संवर्धनाचा चांगला मार्ग आहे.
4) जर योग्य व्यवस्थापन केले तर नदी हा मासे मिळविण्याचा उत्तम स्त्रोत आहे.

---

12. आठ मित्र क्रिकेटचा सामना पाहत पुढीप्रमाणे बसले आहेत. अशोकच्या उजव्या बाजुला भरत असून, त्याच्या उजवीकडे कोणीही नाही. इंद्रदेव व गणेश यांच्यामध्ये आदित आहे. हुसेनचया उजव्या बाजुला गणेश आहे. भरत व धनराज यांच्यामध्ये अशोक आहे.इंद्रदेव हा धनराजच्या शेजारी आहे. अंजली कोणत्या तरी एका कडेला आहे ? तर अशेक व गणेश यांच्यामध्ये किती व्यक्ती आहेत ?

1) 1  2) 2  3) 3  4) 4

---

13. पुढे विधाने व निष्कर्ष दिले आहेत. ही विधाने सत्य मानून कोणता/ते निष्कर्ष तर्कदृष्टया यथार्थ आहे/त. ते त्यांच्या संदर्भात टरवा.

विधाने : अ. बहुसंख्य सफरचंदे आंबे आहेत.
ब. एकही सफरचंद मृदूफळ नाही.
क. सर्व मृदूफळे आंबे आहेत.

निष्कर्ष : 1. काही आंबे हे मृदूफळे नाहीत.
2. सर्व आंबे हे मृदूफळे नाहीत.
3 . काही सफरचंदे आंबे आहेत.
4. काही सफरचंदे ही मृदूफळे नाहीत.

पर्यायी उत्तरे :

1) सर्व यथार्थ  2) फक्त 1, 3 व 4 यथार्थ
3) फक्त 2, 3 व 4 यथार्थ  4) एकतर 1 किंवा 2, 3 व 4 यथार्थ

---

14. राजस्थान रायका या भटक्या जमातीचे जिवन हे त्यांच्या उंटाशी बांधलेले आहे. आणि त्या उंटाची जोपासना करण्यात पारंगत आहेत. उंट हा त्यांचा पोषण स्त्रोत आहे व उंटाच्या तांडयाचा आकार हे त्यांच्या प्रतिष्टेचे माप आहे. या समुहातील प्रत्येक सदस्य स्वतःच्या तांडयातील प्रत्येक उंटाला त्याच्या पावलाच्या ठश्यांवरून ओळखण्यात पारंगत असतात. याच प्रमाणे दुधाच्या वासावरूण त्यांना उंटीनही ओळखता येते. उंटाच्या दुधात कॅल्शियम कमी प्रमाणात असते पण ते क्लोराइड्स आणि फॉस्फरस यांनी समृद्ध असते. गाईच्या दूधाच्या तुलनेत त्यात दहापट ''क'' जिवनसत्व असते. उंट वाळवंटात वाढणाऱ्या झुडुपाच्या पाल्यावर जगत असल्यामुळे त्या दुधात अनेक औषधी गुणधर्म असतात. उंटाच्या दुधात नैसर्गिक प्रतिजैवकाप्रमाणे कार्य करणारे खास प्रकारचे प्रोटीन असते. आणि असा समज आहे ही ते या जमातीच्या लोकांचे रोगांपासून रक्षण करते. त्यात इन्सुलिनही असते. रायकांची अशी समजुत आहे की दूध विकणे हे पाप आहे. परिणामी उंट सांभाळने त्यांना फादेशीर ठरत नाही.

YASH ACADEMY

परिच्छेदातील सर्व माहीतीच्या आधारे निश्चितपणे काढता येणारे अनुमाण निवडा.
1) दुधाचे गुणधर्म हे रायकांच्या जगण्यासाठी उंटांवर पूर्णपणे अवलंबून असण्याचा पूरावा आहे.
2) रायकांना स्वतः च्या उंट जोपासण्याच्या पारंपारीक ज्ञानाचा उपयोग करूण दुधाचे व्यापारी तत्वावर उत्पादन करणे शक्य आहे.
3) उटांच्या दुधात इन्सुलिन असल्यामुळे त्याचा उपयोग मधुमेहावरील सर्वसाधारण उपचारांसाठी करता येतो.
4) उंटाच्या दुधात नैसर्गिक प्रतिजैवक असल्यामुळे त्याचा उपयोग रोगावरील सर्वसाधारण उपचारांसाठी करता येईल.

15. एका परीक्षेत 70% विद्यार्थी इंग्रजीत उत्तीर्ण झाले, 65% विद्यार्थी गणितात उत्तीर्ण झाले, 25% विद्यार्थी दोन्ही विषयात अनुत्तीर्ण झाले. जर 3000 विद्यार्थी दोन्ही विषयात उत्तीर्ण झाले असतील, तर एकूण किती विद्यार्थांनी परीक्षा दिली?
1) 7500 2) 5000 3) 6000 4) 8000

## महाराष्ट्राचा भूगोल

16. महाराष्ट्राच्या पर्जन्याचा नकाशा (2013-2014) चा अभ्यास करा आणि योग्य उत्तर द्या.




अ. 2014 नुसार महाराष्ट्राच्या मध्यवर्तीय भागात सरासरी पर्जन्यमान 0 ते 80 एकढे आहे.
ब. 2013 नुसार महाराष्ट्राच्या उत्तरेस 120 व त्यापेक्षा जास्त सरासरी पर्जन्यमान आढळले.
क. धूळे, जळगाव व अमरावती येथे 2014 नुसार 120 व त्यापेक्षा जास्त पाऊस पडतो.
ड. महाराष्ट्रात 2013 पेक्षा 2014 मध्ये पावसाचे प्रमाण जास्त असते.
पर्यायी उत्तरे :
1) अ बरोबर 2) ब बरोबर 3) अ व ब बरोबर 4) क व ड बरोबर

17. भारतातील लोह खनिजाच्या एकूण साठयांपैकी किती टक्के साठा महाराष्ट्रात आहे?
1) 40 2) 25 3) 20 4) 15

18. योग्य जोड्या लावा.

| डोंगर | जिल्हा |
|---|---|
| अ. चिकोडी | 1. नंदुरबार |
| ब. मढोशी | 2. जळगांव |

क. तोरणमाळ 3. सातारा
ड. हस्ती 4. कोल्हापूर
पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 4 | 2 | 1 |
| 2) | 2 | 1 | 4 | 3 |
| 3) | 4 | 3 | 1 | 2 |
| 4) | 1 | 2 | 3 | 4 |

19. 2001 व 2011 या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील साक्षरतेचा फरक किती टक्के आहे ?
1) +5.24 2) +5.40 3) -4.52 4) -3.48

20. महाराष्ट्रातील कोणत्या प्रशासकीय विभागात सर्वात जास्त जिल्हे आहेत?
1) अमरावती 2) नाशिक 3) औरंगाबाद 4) नागपूर

21. खालील नमूद महाराष्ट्रातील प्रशासकीय विभागांना त्यांच्या क्षेत्रफळानुसार उतरत्या क्रम लावा :
अ. नागपूर ब. नाशिक क. अमरावती ड. औरंगाबाद
य. पुणे
पर्यायी उत्तरे :
1) य, ब, ड, अ, क 2) ड, य, ब, क, अ 3) ब, ड, क, य, अ 4) ड, ब, य, अ, क

22. योग्य जोड्या जुळवा (अभयारण्ये आणि जिल्हा) :

| अभयारण्य | जिल्हा |
|---|---|
| अ. बोर | 1. धुळे |
| ब. नर्नाळा | 2. रायगड |
| क. अनेर | 3. अकोला |
| ड. कर्नाळा | 4. वर्धा |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 4 | 1 | 3 |
| 2) | 3 | 1 | 4 | 2 |
| 3) | 4 | 2 | 3 | 1 |
| 4) | 4 | 3 | 1 | 2 |

23. कोंकणात कोणत्या प्रकारच्या वस्तीचे प्राबल्य आहे?
1) विखुरलेल्या 2) केंद्रीत 3) अपखंडीत 4) संयुक्त

24. खालील नमुद सह्याद्रीतील प्राकृतिक भूरचनांचे उत्तर- दक्षिण अभिमुखता क्रम लिहा.
अ. कुंभारली घाट ब. वरंध घाट क. रायगड किल्ला ड. प्रतापगड किल्ला
पर्यायी उत्तरे :
1) ड, क, ब, अ 2) क, ब, ड, अ 3) ब, अ, ड, क 4) अ, ड, क, ब

25. खालील विधाने पहा आणि योग्य विधानाची निवड करा.
अ. पूर्णा ही तापी नदीची उपनदी आहे. ब. तापी नदी पश्चिमवाहिनी नदी म्हणून ओळखली जाते.

क. तापी नदी पूर्वे दिशेकडे वाहत जाते.
ड. तापी नदीचे खोरे हे तापी - पूर्णा खोरे म्हणून ओळखले जाते.
पर्यायी उत्तरे :
1) अ, ब, ड 2) अ, ब, क 3) ब, क, ड 4) ड, ब, क

## महाराष्ट्राचा इतिहास

26. लोकमान्याचे पुत्र श्रीधरपंत टिळक यांनी ________ यांच्या श्रीकृष्ण मेळ्याचा कार्यक्रम टिळकांच्या वाडयात घडवून आणण्यासाठी त्यांना निमंत्रण दिले आणि पुण्यातील सनातन्यांचा रोष ओढवून घेतला.
1) केशवराव जेधे
2) पांडूरंग नथूजी राजभोज
3) महादेव शास्त्री दिवेकर
4) ल. ब. भोपटकर

27. विख्यात इतिहासकार य. दि. फडके म्हणतात, ''कर्मठ सनातन्यांनी त्यांच्या व्याकरणाच्या चुका दाखवून बाजी मारण्याचा प्रयत्न केला , पण त्यांचा मानवी हक्क आणि समतेबद्दलचा विचार प्रतिपक्षाला दडपून टाकता आला नाही.'' हे विचारवंत कोण ?
1) बाबा पदमनजी
2) भी. रा. आंबेडकर
3) गो. ग. आगरकर
4) ज्योतीराव फुले

28. पुढीलपैकी कोणत्या वृत्तपत्रांच्या संपादकांना ब्रिटीश सरकारविरोधी लेखनाबद्दल तुरूंगवास घडला नाही ?
1) प्रतोद 2) विश्ववृत्त 3) ज्ञानप्रकाश 4) देश सेवक

29. पुढील विधाने काळजीपूर्वक वाचून योग्य पर्याय निवडा.
अ. अमेरिकन यादवी युद्ध संपल्यावर महाराष्ट्रात कापसाचे भाव कोसळले.
ब. महाराष्ट्रातील दुष्काळातही इंग्रज सरकारने सारावसुलीची सक्ती केली.
क. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सावकारांकडून कर्जे काढावी लागत व ते कर्जबाजारी होत.
पर्यायी उत्तरे :
1) अ, ब, आणि क ही एकमेकांशी संबंध नसलेली विधाने आहेत.
2) अ हे असंबद्ध आहे, ब हे क चे कारण आहे.
3) अ आणि ब यांचा परिणाम क आहे.
4) अ चा परिणाम ब, तर ब चा परिणाम क आहे.

YASH ACADEMY TM

30. 1912 साली भरलेल्या मुस्लिम लीगच्या सहाव्या अधिवेशनास मोहम्मद अली जिन्नाह, बिशन नारायण धर आणि ________ हे निमंत्रित पाहूणे होते.
1) अबूल कलाम आझाद
2) सरोजिनी नायडू
3) मोहम्मद अमीर खान
4) कमला दास

31. स्त्रियांचे आरोग्य आणि कुटुंब नियोजन या मुद्यांवर भर देणारे 'समाज स्वास्थ' हे मासिक कोणी चालविले?
1) धोंडो केशव कर्वे
2) रघुनाथ धोंडो कर्वे
3) दिनकर कर्वे
4) इरावती कर्वे

32. 30 डिसेंबर 1906 रोजी जेव्हा मुस्लिम लिगची स्थापना झाली, तेव्हा ढाका येथे ________ च्या विसाव्या अधिवेशनासाठी मुस्लिम प्रतिनिधी एकत्र आले होते.
1) भारतीय राष्ट्रीय सभा
2) मुस्लिम शिक्षण परिषद
3) मुस्लिम राष्ट्रीय सभा
4) बंगाल मुस्लिम काँग्रेस

33. परमहंस सभा लयाला गेल्यानंतर तिच्या सभासदांनी 1867 मध्ये ________ यांच्या अध्यक्षतेखाली प्रार्थना समाजाची स्थापना केली.

1) दादोबा पांडूरंग तर्खडकर
2) आत्माराम पांडूरंग तर्खडकर
3) नारायण वामन टिळक
4) भाऊ महाजन

34. 1898 - 99 मध्ये आलेल्या बंध विमोचन आणि लोकमतविजय या नाटकांवर सरकारणे बंदी घातली कारण त्यात आडवळणाने ____________ यांचा उल्लेख होता.
1) न्यायमुर्ती रानडे
2) लॉर्ड कर्झन
3) लोकमान्य टिळक
4) लॉर्ड सँडहर्स्ट

35. लाहोरच्या भारत माता सोसायटी चे क्रांतीकारी नेते ____________ यांच्या सभा 'पगडी संभाल ओ जट्टा!' (अरे शेतकऱ्या, आपली प्रतिष्ठा जप!) या गाण्याने सुरू होत.
1) सरदार त्रिलोचन सिंग
2) सरदार अजित सिंग
3) सरदार भगत सिंग
4) सरदार तारलोक सिंग

## भारतीय राज्यघटना

36. जोड्या लावा (अनुच्छेद आणि मूलभुत अधिकार)

| 'अ' अनुच्छेद | 'ब' मूलभुत अधिकार |
|---|---|
| अ. अनुच्छेद 15 | 1. पदव्यांची समाप्ती |
| ब. अनुच्छेद 17 | 2. कायद्यासमोर समानता |
| क. अनुच्छेद 18 | 3. भेदभावाचा अभाव |
| ड. अनुच्छेद 14 | 4. अस्पृश्यतेची समाप्ती |
| | 5. संधीची समानता |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 4 | 2 | 1 |
| 2) | 5 | 4 | 1 | 3 |
| 3) | 3 | 4 | 1 | 2 |
| 4) | 5 | 3 | 4 | 1 |

THE YASH ACADEMY TM

37. खालीलपैकी कोणते भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्य (कर्तव्ये) आहेत ?
अ. भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि एकात्मता यांचा आदर करणे व त्यांचे संरक्षण करणे.
ब. संविधानाचे पालन करणे तसेच राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
क. विज्ञाननिष्ठ दृष्टीकोण आणि मानवतावाद, शोधक बुद्धी विकसित करणे.
वरीलपैकी योग्य पर्याय निवडा :
1) फक्त ब
2) फक्त अ आणि क
3) फक्त ब आणि क
4) वरील सर्व

38. अयोग्य कथन ओळखा :
1) जुलै, 1947 मध्ये भारताच्या संविधान सभेने राष्ट्रीय ध्वजाचा आराखडा स्विकारला.
2) कॅबिनेट मिशन योजना 1946 च्या अंतर्गत स्थापन झालेल्या संविधान सभेव्दारा भारताची राज्य घटना कार्यान्वित झाली.
3) जून, 1946 मध्ये स्थापन झालेल्या संविधान सभेचे महात्मा गांधी सदस्य नव्हते.
4) भारताच्या संविधान सभेच्या उद्घाटन बैठकीची अध्यक्षता डॉ. राजेद्र प्रसाद यांनी केली.

39. खालीलपैकी कोणत्या विषयांचा समावेश हा केंद्र सूचित आहे ?
अ. रेल्वे
ब. युद्ध व शांतता
क. पोलीस
ड. शेती

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ आणि क 2) फक्त क आणि ड 3) फक्त अ आणि ब 4) फक्त अ, ब आणि क

40. खालील विधाने विचारात घ्या :

अ. राज्यपाल हे देशाचे कार्यकारी प्रमुख असतात.

ब. राज्यपाल हे केंद्र किंवा राज्य विधीमंडळाचे सदस्य असणे आवश्यक आहे.

क. राल्यपाल आपला राजीनामा राष्ट्रपतीकडे सुपुर्द करतात.

वरीलपैकी कोणते विधान (ने)बरोबर आहे/ आहेत ?

1) फक्त अ 2) फक्त क 3) फक्त ब आणि क 4) वरील सर्व

41. भारतीय संविधानातील विविध स्त्रोताशी संबंधित यादी - 1 व यादी -2 जुळवून दिलेल्या उत्तरातील योग्य पर्याय निवडा.

| यादी - 1 | यादी - 2 |
|---|---|
| अ. मूलभूत हक्क | 1. आयर्लंडची राज्यघटना |
| ब. संसदीय लोकशाही | 2. अमेरिकेची राज्यघटना |
| क. संसदेचे संयुक्त अधिवेशन | 3. ब्रिटीश राज्यघटना |
| ड. राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे | 4. ऑस्ट्रेलियाची राज्यघटना |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 3 | 1 | 4 |
| 2) | 4 | 2 | 1 | 3 |
| 3) | 2 | 3 | 4 | 1 |
| 4) | 3 | 1 | 2 | 4 |

42. खालीलपैकी कोणत्या जोड्या योग्यरित्या जुळलेल्या आहेत ?

अ. परिशिष्ट पहिले - राज्यसभेचे जागावाटप

ब. परिशिष्ट तिसरे - विविध शपथा

क. परिशिष्ट सहावे - आसाम मधील आदिवासी भागातील प्रशासनाशी संबंधित तरतूद

ड. परिशिष्ट दहावे - पक्षांतर विरोधी कायदा

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ, ब आणि क 2) फक्त ब, क आणि ड

3) फक्त अ, ब आणि ड 4) वरीलपैकी सर्व

43. खालीलपैकी कोणते विधान/ ने बरोबर आहे/ आहेत ?

अ. मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ देशाचे धोरण आखतात आणि त्याची अंमलबजावणी करतात.

ब. मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ हे सामुहिकरित्या राज्य विधीमंडळाला जबाबदार असतात.

क. मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ हे राज्याच्या कार्यकारी मंडळाचे वास्तविक प्रमुख असतात.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ आणि ब 2) फक्त ब आणि क 3) फक्त ब 4) वरील सर्व

44. अयोग्य कथन ओळखा.

1) समान नागरी कायदा ही लोकशाही यशस्वी कार्यरत राहण्याची आवश्यक पूर्व अट आहे.

2) समान नागरी कायदा हा जागतिकीकरणाच्या विश्वामधून धार्मिक राजकारण पूसुन टाकेल.

3) समान नागरी कायदा हा अल्पसंख्यांकाचे धार्मिक अधिकार नष्ट करेल.

4) समान नागरी कायदा हा धार्मिक विचारधारेवर आधारीत विसंगती दूर करूण राष्ट्रीय एकात्मतेस मदत करेल.

45. आंतर- राज्य परिषदेची स्थापना भारतीय संविधानाच्या कोणत्या कलमान्वये करण्यात आली ?
1) कलम 263
2) कलम 283
3) कलम 292
4) कलम 352

## नियोजन

46. भारत सरकारने मार्च, 1950 मध्ये नियोजन आयोगाची स्थापना ________ यांच्या अध्यक्षतेखाली केली.
1) राजेंद्र प्रसाद
2) पंडीत जवाहरलाल नेहरू
3) सरदार वल्लभभाई पटेल
4) यशवंतराव चव्हाण

47. आर्थिक विकासाचे सामाजिक निर्देशक कोणते आहेत ?
अ. शिक्षण
ब. स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ
क. अन्न
ड. स्वच्छता
पर्यायी उत्तरे :
1) फक्त ब
2) अ, ब आणि क
3) अ, क आणि ड
4) वरील सर्व

48. अरूणचल प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, नागालँड, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश ही राज्ये ________ मानवी विकास निर्देशांक (HDI) श्रेणीमध्ये येतात.
1) उच्च
2) मध्यम
3) न्यून
4) तटस्थ

49. 73 आणि 74 वी घटना दुरूस्तीचा ________ कलमाशी जवळचा संबंध आहे.
1) कलम 243
2) कलम 239
3) कलम 143
4) कलम 249

50. आर्थिक विषमता कमी करण्याच्या उद्दिष्टाला भारताच्या नियोजनमध्ये ________ स्थान देण्यात आले.
1) उच्च
2) न्यून
3) शून्य
4) तटस्थ

51. नवव्या पंचवार्षिक योजनेनूसार जी. डी. पी वाढीच्या दराचा इष्टांक ________ होता.
1) 8 %
2) 6.5 %
3) 7 %
4) 7.5 %

52. खालीलपैकी कोणती /ते विधान / विधाने बरोबर आहेत ?
अ. आर्थिक नियोजनेच्या 63 वर्षाच्या कालावधित राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ दरवर्षी 4.7 टक्के या दराने झाल्याचे आढळले.
ब. आर्थिक नियोजनेच्या पहिल्या तीन दशकात राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर दरवर्षी 3.5 टक्केपेक्षा कमी राहील.
क. 63 वर्षाच्या नियोजन काळात दरडोई उत्पन्न आतापर्यंत दरवर्षी 4.8 टक्के दराने वाढल्याचे आढळून येते.
पर्यायी उत्तरे :
1) अ आणि ब दोन्ही
2) फक्त अ
3) ब आणि क दोन्ही
4) फक्त क

53. 11 ऑक्टोंबर,2014 रोजी सांसद आदर्श ग्राम योजना ________ या उद्दिष्टांसह सूरू करण्यात आली.
1) स्वास्थ, स्वच्छता, हरितता आणि सौहार्दपूर्णता यांचे केंद्र
2) निर्यात क्षेत्र
3) आयात क्षेत्र
4) विदेशी विनिमय

54. अनुसूचित जाती, अनूसुचित जमाती, इतर भागास जाती आणि अल्पसंख्यांक संबंधित मुलींसाठी प्राथमिक स्तरावर निवासी शाळा प्रदान करणारी योजना ________ आहे.

1) मुलीच्या शिक्षणसाठी राष्ट्रीय कार्यक्रम
2) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान
3) साक्षर भारत
4) कस्तूरबा गांधी बालिका विद्यालय

55. 1999-2000 मध्ये कोणत्या राज्यात दारिद्र्याचे प्रमाण सर्वाधिक होते ?
1) महाराष्ट्र 2) बिहार 3) त्रिपूरा 4) ओरिसा

## शहरी व ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास

56. ऊर्जेचे पारंपारिक स्त्रोत कोणते आहेत ?
अ. जलविद्यूत ब. तेल व वायू क. सौर ऊर्जा ड. वायू ऊर्जा
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब दोन्ही 4) क आणि ड दोन्ही

57. खालील विधाने विचारात घ्या.
अ. 2006 मध्ये भारतीय पायाभूत सुविधा वित्तीय कंपनी मर्यादित ची स्थापना झाली.
ब. भारतीय पायाभूत सुविधा वित्तीय कंपनी मर्यादित कडून पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी अल्पकालीन कमी मुदतीचा वित्त पुरवठा केला जातो.
क. डिसेंबर, 2007 मध्ये भारतीय पायाभूत सुविधा प्रकल्प विकास निधीची सुरूवात झाली.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?
1) अ आणि ब दोन्ही 2) ब आणि क दोन्ही 3) अ आणि क दोन्ही 4) वरील सर्व

58. खालीलपैकी कोणत्या ऊर्जेचे नुतनीकरण करता येते ?
अ. व्यापारी ऊर्जा ब. बिगरव्यापारी ऊर्जा क. जळाऊ लाकुड ड. पेट्रोलियम
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ 2) अ आणि ब दोन्ही 3) ब आणि क दोन्ही 4) वरील सर्व

THE YASH ACADEMY TM

59. खालील विधाने विचारात घ्या :
अ. भारताच्या व्यापारामध्ये 59 टक्के वाटा आकारमानानुसार आणि 86 टक्के वाटा मूल्यानुसार हा जहाजमार्गाने (समुद्रामार्गाने) होणाऱ्या व्यापाराचा आहे.
ब. दूरसंचार क्षेत्राचे जाळे विस्तारीत संदर्भात सद्यस्थितीत चीन पाठोपाठ भारताचा दूसरा क्रमांक लागतो.
क. दूरसंचार क्षेत्राला उत्तेजन देण्यासाठी भारत सरकारणे सन 2012 मध्ये राष्ट्रीय दूरसंचार धोरणाची घोषणा केली.
वरीलपैकी कुठले विधान/ विधाने चूक आहे/ आहेत?
1) अ आणि क दान्ही 2) फक्त ब 3) फक्त अ 4) फक्त क

60. 1994 च्या राष्ट्रीय टेलीकॉम धोरणाशी खालीलपैकी कोणत्या बाबी संबंधित आहे?
अ. भारतीय व परकीयांना गुंतवणूक खुली.
ब. फक्त भारतीयांना गुंतवणूक खुली.
क. 1996 पर्यंत सर्व खेडे टेलीफोन सेवेशी जोडणे.
ड. ग्रामीण भागासाठी मोफत दुरध्वनी सेवा.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त अ, ब आणि क 4) वरील सर्व

61. खालीलपैकी वाहतूकीचा कोणता प्रकार स्थूल घरघुती उत्पन्नात (GDP) शेकडा जास्त हिस्सा दर्शवतो ?
1) रेल्वे 2) रस्ते वाहतूक 3) जल वाहतूक 4) हवाई वाहतूक

62. 2009 - 10 पर्यंत रेल्वे मार्गाची प्रगती ____________ कि. मी. होती.
1) 53600
2) 63028
3) 63900
4) 63974

63. 2008- 09 यावर्षी पायाभूत सुविधामध्ये विदेशी थेट गुंतवणुक प्रवाह ____________ इतका होता.
1) रूपये 5225 कोटी
2) रूपये 5400 कोटी
3) रूपये 6485 कोटी
4) रूपये 8989 कोटी

64. रस्ते विकासातील मुख्य समस्या कोणत्या आहेत?
अ. रस्ते विकासाची मंदगती
ब. निकृष्ट दर्जा
क. विषम विभाजन
ड. उच्च वाहतूक खर्च
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ
2) ब आणि क दोन्ही
3) वरीलपैकी एकही नाही
4) वरील सर्व

65. आर्थिक वृद्धिची श्रेणी, दरडोई उत्पन्नाचा आकार आणि ____________ यामध्ये प्रत्यक्ष सहसंबंध आहे.
1) दरडोई अन्न उपभोग
2) दरडोई सोयी सुविधा उपभोग
3) दरडोई ऊर्जा उपभोग
4) दरडोई दळणवळण उपभोग

## आर्थिक सुधारणा व कायदे

66. आर्थिक सुधारणासंदर्भात खालीलविधाने विचारात घ्या :
अ. सरकारच्या भूमिकेचे रूपांतर नियंत्रका कडून सुविधा पुरविणारा असे झाले.
ब. पायाभूत क्षेत्रात योग्य सुविधा पुरविण्यास सरकार बांधिल आहे.
क. पंचायती राज संस्था पूर्णपणे कार्यान्वित करण्यास सरकार बांधील आहे.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) अ आणि ब दोन्ही
2) ब आणि क दोन्ही
3) अ आणि क दोन्ही
4) वरील सर्व

YASH ACADEMY

67. आर्थिक सुधारणे नंतरच्या काळात समाधान कारक आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल स्थितीसाठी खालीलपैकी कोणती कारणे जबाबदार होती?
1) अदृश्य खात्यात उच्च कमाई
2) बाहय व्यापारी कर्जामध्ये झालेली वाढ
3) अनिवासी भारतीयांच्या ठेवी आणि विदेशी गुंतवनुकीची भूमिका
4) वरील सर्व कारणे

68. निर्यात प्रकिया क्षेत्राचे (EPZ) रूपांतरण पुढीलपैकी कशामध्ये करण्यात आले ?
1) कृषी निर्यात क्षेत्र (AEZ)
2) मुक्त व्यापार व वखार क्षेत्रे (FTWZ)
3) विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ)
4) मुक्त औद्योगिक क्षेत्रे (FIZ)

69. खालील विधाने विचारात घ्या :
अ. फेमा कायद्यांतर्गत भारतात परकीय गुंतवणुकीची सुरूवात 2000 मध्ये झाली.
ब. 2015 मध्ये भारत हा सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणारा देश ठरला आहे.
क. 2015 मध्ये भारतात 63 दशलक्ष डॉलर परकीय गुंतवणूक झाली.
वरीलपैकी कोणते/ती विधान /ने असत्य आहे/ आहेत?
1) फक्त अ
2) फक्त ब
3) फक्त क
4) फक्त अ आणि ब

70. खालील विधाने विचारात घ्या :
अ. कर्ज परतफेड हमी निधिची स्थापना 2004- 2005 मध्ये झाली.
ब. निर्गुंतवणूक विभागाची स्थापना 2002-2003 मध्ये झाली.
क. खर्च सुधारणा आयोगाची स्थापना फेब्रूवारी, 2000 मध्ये झाली.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत?
1) फक्त अ आणि ब 2) फक्त ब आणि क 3) फक्त अ आणि क 4) वरील सर्व

71. डंकेल मसुदयावर भारताने कोणत्या दिवशी स्वाक्षरी केली ?
1) 15 एप्रिल, 1993 2) 15 जुलै, 1993 3) 15 एप्रिल, 1994 4) 15 जुलै, 1994

72. 1991 ची कर सुधारणा समिती ———— च्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आली होती ?
1) श्री विजय केळकर 2) राजा जे. चेलीया 3) एल. के. झा 4) एम. गोविंद राव

73. खालील विधाने विचारात घ्या :
अ. मूल्यवर्धित कर (VAT) ही बहुउद्देशीय कर गोळा करणारी पद्धती आहे.
ब. अ- मूल्यवर्धित कर ही एकल बिंदू करभरणा करणारी पद्धती आहे.
क. मूल्यवर्धित कराच्या अमलबजावणीमुळे गरीब लोकांच्या राहणीमानात सुधारणा आणि खरेदी शक्तीत वाढ होईल.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त अ व क 4) वरील सर्व

74. वस्तु व सेवा करामध्ये पुढीलपैकी कोणत्या करदराचा समावेश होत नाही ?
अ. 5 टक्के ब. 12 टक्के क. 22 टक्के ड. 28 टक्के
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ आणि ब 2) फक्त क आणि ड 3) फक्त अ, ब आणि ड 4) फक्त क

75. खालील विधाने विचारात घ्या :
अ. केंद्रीय विक्रीकर कायदा, 1956 नुसार विक्रीकर हा आंतर राज्य वस्तू विक्रीकर आकारला जातो.
ब. केंद्रीय विक्रीकर दरामध्ये जुन, 2008 पासून 3% वरून 2% पर्यंत कपात करण्यात आली.
क. केंद्रीय विक्रीकर हा प्रामुख्याने सवलत (सुट) नसलेला स्त्रोताधारित कर आहे.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त अ व क 4) वरील सर्व

## आंतरराष्ट्रीय व्यापार व आंतरराष्ट्रीय भांडवल चळवळ

76. खालील विधाने विचारात घ्या :
अ. (एप्रिल - नोव्हेंबर) 2016-2017 मध्ये भारताची आफ्रिकेशी निर्यात, 13.5% नी घटली.
ब. (एप्रिल - डिसेंबर) 2016-2017 या काळात भारताची भांडवली वस्तुची आयात 8.8% नी घटली.
क. 2016-2017 (एप्रिल - नोव्हेंबर) मध्ये भारताची सी. आय. एस. आणि बाल्टीकस विभागातुन आयात 10.3% नी घटली.
वरीलपैकी कोणती विधाने असत्य आहे?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त क 4) फक्त अ

77. पुढीलपैकी योग्य विधान निवडा :
अ. भारताच्या व्यापारविषयक धोरणांची तपासणी करण्यासाठी सन 1962 मध्ये रामस्वामी मुदलियार समिती नेमण्यात आली.
ब. या समितीने सुचविले की, ऊर्जा व वाहतुक क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक यंत्रसामग्री व कच्चा माल आयात करण्यात यावा.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ 2) फक्त ब

3) अ आणि ब दोन्ही 4) वरीलपैकी एकही नाही.

---

78. परकीय व्यापार धोरण 2009-2014 संबंधित खालील विधाने विचारात घ्या :

अ. सरकारी दीर्घकालीन धोरणांचे उद्दिष्ट हे 2020 पर्यंत भारताचा जागतीक व्यापारातील हिस्सा दूप्पट करणे हे आहे.

ब. परकीय व्यापार धोरणाने 50 नवीन बाजारपेठांचा समावेश लक्ष्य केंद्रीत 'बाजारपेठ' योजनेत केला.

क. सरकारणे वाढीव निर्यात प्रोत्साहन योजना डिसेंबर 2012 मध्ये जाहीर केली.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

1) फक्त अ व ब 2) फक्त अ व क 3) फक्त ब व क 4) वरीलपैकी सर्व

---

79. विदेशी व्यापार धोरण (2015-2020) मध्ये एम. इ. आय. एस. व एस. इ. आय. एस. योजनेअंतर्गत ही सवलत दिली जाते.

1) कर कर्ज लेख 2) निर्यात आयात पासबुक 3) आयात परवाना 4) निर्यात परवाना

---

80. भारतात विदेशी थेट गुंतवणूकीची खालील ठिकाणी नोंद केली जाते :

1) भारतीय रिझर्व्ह बँकेची 51 पर्यंतच्या समभागाच्या ताब्याची विनासायासी मार्गाने मान्यता

2) विदेशी गुंतवणुक संवर्धन मंडळ

3) भारतीय रिझर्व्ह बँकेची अनिवासी भारतीय योजना

4) वरीलपैकी सर्व

---

81. थेट विदेशी गुंतवणूक अर्थव्यवस्थेची उत्पादन क्षमता वाढविण्यास मदत करते, तर रोख्यांमधील विदेशी गुंतवणूक सट्टेबाजी स्वरूपाची आणि म्हणुन ———— असते.

1) शाश्वत / निरंतर स्वरूपाची 2) लहरी स्वरूपाची 3) वाढत्या स्वरूपाची 4) घटत्या स्वरूपाची

---

82. खालील विधाने विचारात घ्या :

अ. जानेवारी, 2004 मध्ये, वैज्ञानिक आणि तांत्रिक नियत कालिके, मासिके आणि साप्ताहीके यांच्या मुद्रणातील 100% पर्यंत परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक करण्यासाठी सरकारणे परवानगी दिली.

ब. जानेवारी, 2004 मध्ये, सरकारने पेट्रोलियम क्षेत्रातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक मर्यादा 100% पर्यत वाढविली.

क. व्यवसायांना ई-व्यापार व्यवसायासाठी परकीय प्रत्यक्ष गुंतवणुक 80% करण्यासाठी परवानगी दिली.

वरीलपैकी कोणते /ती विधान/ने बरोबर आहे/आहेत?

1) फक्त अ 2) फक्त अ व ब 3) फक्त अ व क 4) फक्त ब व क

---

83. भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नियंत्रण करणाऱ्या संस्था खालीलप्रमाणे आहेत :

अ. कंपनी व्यवहार मंत्रालय ब. भारतीय रिझर्व बँक

क. औद्योगिक विकास मंत्रालय ड. वित्त मंत्रालय

वरीलपैकी कोणते पर्याय असत्य आहेत ?

1) फक्त अ व ब 2) फक्त क व ड 3) फक्त अ व ड 4)वरीलपैकी एकही नाही.

---

84. विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होतो ?

अ. मुक्त व्यापार प्रदेश (FTZ) ब. निर्यात प्रक्रीया प्रदेश (EPZ)

क. औद्योगिक वसाहती (IE) ड. मुक्त बंदरे (FP)

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ आणि ब 2) फक्त ब आणि ड 3) फक्त ब आणि क 4) वरील सर्व

---

85. खालील विधाने विचारात घ्या :
अ. आंतरराष्ट्रीय नाणे निधी ही संयुक्त राष्ट्राची विशेष संस्था आहेत.
ब. सध्या 200 देश आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे सभासद आहेत.
क. आंतरराष्ट्रीय नाणे निधी आंतरराष्ट्रीय व्यवहारशेषातील तूट अनुभवाच्या सभासद देशाला निधी देते.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त अ व क 4) वरील सर्व

## सार्वजनिक वित्त व्यवस्था

86. मुल्यवर्धित करासंदर्भात खालील विधाने विचारात घ्या :
अ. अप्रत्यक्ष करातील बाहूल्य नष्ट करण्यासाठी मूल्यवर्धित कर लागू होतो.
ब. सर्व राज्यातील विविध वस्तूसाठी मूल्यवर्धित कराचे दर एक सारखे आहेत.
क. मूल्यवर्धित कर प्रणाली 10 एप्रिल, 2006 पासून अमलात आली.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ आणि ब 2) फक्त ब आणि क 3) फक्त अ आणि क 4) वरील सर्व

87. करेत्तर महसूली उत्पन्नमध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होतो ?
अ. वित्तीय सेवांपासून उत्पन्न
ब. व्याजापासूनचे उत्पन्न
क. लाभांश व नफा (सार्वजनीक उपक्रम)
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ आणि ब 2) फक्त अ आणि क 3) फक्त ब आणि क 4) वरील सर्व

88. खालील विधाने विचारात घ्या :
अ. केंद्र सरकारच्या महसूली खर्चाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी असणारे प्रमाण 2015- 2016 मध्ये 11.4% होते.
ब. केंद्र सरकारच्या व्याज देयकाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी असणारे प्रमाण 2015- 2016 मध्ये 8.3% होते.
क. केंद्र सरकारच्या भांडवली खर्चाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी असणारे प्रमाण 2015- 2016 मध्ये 1.7% होते.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क
3) फक्त अ व क 4) वरील सर्व

89. केंद्र सरकारच्या राजकोषीय असमतोच्या संदर्भात (2015-2016) खालील जोड्या लावा :

| कॉलम 'अ' (तपशील) | कॉलम 'ब' (स्थूल देशांतर्गत उत्पादनाची टक्केवारी) |
|---|---|
| अ. महसूली तूट | 1. 1.9% |
| ब. स्थूल राजकोषीय तूट | 2. 0.7% |
| क. प्राथमिक तूट | 3. 3.9% |
| ड. मुख्य अनूदाने | 4. 2.5% |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 4 | 3 | 2 | 1 |
| 3) | 3 | 4 | 1 | 2 |
| 4) | 2 | 1 | 4 | 3 |

90. खालील विधाने विचारात घ्या :
अ. महसूली तूट म्हणजे चालू प्राप्तीपेक्षा चालू खर्च जास्त असणे.
ब. अंदाजपत्रकीय तूट म्हणजे एकूण प्राप्तीपेक्षा खर्च जास्त असणे.
क. राजकोषीय तूट ही सरकारला सर्व मार्गांनी मिळणाऱ्या एकूण महसूली गरजांची निर्देशक असते.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त अ व क 4) वरील सर्व

91. ———— हा खर्च केंद्र सरकारचा विकास खर्च नाही.
1) व्याज अदा करण्यासाठीचा खर्च 2) सामाजीक सेवांसाठी खर्च
3) अनूदांनांवरील खर्च 4) विकास उउपक्रमांचा विस्तार खर्च

92. पुढीलपैकी कशाचा समावेश तूटीच्या अर्थभरण्याच्या परिणामांमध्ये होतो ?
अ. किंमतींमध्ये वाढ ब. बचत रचनेत बदल क. बँकांची पतनिर्मिती
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ आणि ब 2) फक्त अ आणि क 3) फक्त ब आणि क 4) वरील सर्व

93. खालील विधाने लक्षात घ्या :
अ. अर्थसंकल्पीय तूटीचा भरणा करणारी ट्रेझरी बिल पद्धती 1997 पासून खंडीत करण्यात आली आहे.
ब. ट्रेझरी बिलाची जागा वेझ अँड अँडव्हान्स यानी घेतली आहे.
वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/आहेत?
1) फक्त अ बरोबर आहे 2) फक्त ब बरोबर आहे
3) अ व ब दोन्हीही बरोबर आहेत 4) अ व ब दोन्हीही चूक आहेत.

94. राजकोषीय जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायद्यासंदर्भात खालील विधाने विचारात घ्या :
अ. केंद्र सरकारने राजकोषीय जबाबदारी आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायदा 2004 मध्ये मंजूर केला.
ब. 2009 पर्यत महसूली तूटीत घट करून शून्यावर आणली.
क. मार्च, 2009 पर्यत स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या 3% पर्यत राजकोषीय तूट कमी करणे निर्धारित होईल.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त अ व क 4) वरील पैकी सर्व

YASH ACADEMY TM

95. खालील विधाने विचारात घ्या :
अ. राज्यांच्या राजकोषीय व्यवस्थापनात भारतीय रिझर्व बँक महत्वाची भूमिका पार पाडते.
ब. राज्यांच्या बाजार कर्ज उभारणीत मदत करण्याचे महत्वाचे कार्य रिझर्व बँक करते.
क. भारतीय रिझर्व बँक वर्षातून दोन वेळा राज्य वित्त सचिवांची सभा मुंबई येथील मुख्यालयात आयोजित करते.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त अ व क 4) वरील सर्व

96. खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या अंदाजपत्रकात विद्यमान कार्यक्रम आणि उपक्रम यांना आपोआप/ स्वयंचलित निधी उपलब्ध होत नाही ?
1) पारंपारिक अर्थसंकल्प 2) तात्पूरता अर्थसंकल्प
3) शून्याधारित अर्थसंकल्प 4) असमाधान कारक (Lame)/ नकारात्मक (duck) अर्थसंकल्प

97. खालील विधाने विचारात घ्या :
अ. राष्ट्रीय वित्तीय व्यवस्थापन संस्थेची स्थापना 1993 मध्ये झाली.
ब. राजीव गांधी समभाग बचत योजनेची सुरूवात फेब्रुवारी, 2013 मध्ये झाली.

क. राष्ट्रीय अल्पबचत निधीची स्थापना 2 आक्टोंबर, 2005 मध्ये झाली.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब व क 3) फक्त अ व क 4) वरील सर्व

98. योग्य जोड्या निवडा.

| कॉलम 'अ' (वित्त आयोग) | कॉलम 'ब' (वित्त आयोगाचे अध्यक्ष) |
|---|---|
| अ. पहिला वित्त आयोग | 1. के. सी. पंत |
| ब. आठवा वित्त आयोग | 2. के. सी. नियोग |
| क. दहावा वित्त आयोग | 3. व्ही. एस. केळकर |
| ड. तेरावा वित्त आयोग | 4. यशवंतराव चव्हाण |

पर्यायी उत्तरे:

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 1 | 4 | 3 |
| 2) | 1 | 2 | 4 | 3 |
| 3) | 2 | 4 | 1 | 3 |
| 4) | 4 | 1 | 2 | 3 |

99. राजकोषीय तूट = ________ + सरकारने बाजारातून उभारलेले कर्ज व देयता.
1) भांडवली प्राप्ती 2) महसुली खर्च
3) एकूण खर्च 4) अंदाजपत्रकीय तूट

100. खालील विधाने विचारात घ्या :
अ. प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजना 1 जानेवारी, 2013 रोजी जाहीर केली गेली.
ब. सुरूवातीला भारतातील 35 जिल्हयां मध्ये ही योजना राबविण्यात आली.
क. प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजना ही खर्च नियंत्रण आणि भ्रष्टाचार कमी करणे या उद्देशाने तयार केली गेली आहे.
वरीलपैकी कोणते/ ती विधान /ने सत्य आहे/त ?
1) फक्त अ व ब 2) फक्त ब 3) फक्त ब व क 4) फक्त अ

YASH ACADEMY

ANSWER KEY: STI MAINS 2019 PAPER II (GS)

| Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4 | 16 | 3 | 31 | 2 | 46 | 2 | 61 | 2 | 76 | 3 | 91 | 1 |
| 2. | 4 | 17 | 3 | 32 | 2 | 47 | 3 | 62 | 4 | 77 | 3 | 92 | 2 |
| 3 | 2 | 18 | 3 | 33 | 2 | 48 | 2 | 63 | 2 | 78 | 2 | 93 | 3 |
| 4 | 1 | 19 | 2 | 34 | 3 | 49 | 1 | 64 | 4 | 79 | 1 | 94 | 2 |
| 5 | 2 | 20 | 3 | 35 | 2 | 50 | 2 | 65 | 3 | 80 | 4 | 95 | 4 |
| 6 | 1 | 21 | 4 | 36 | 3 | 51 | 2 | 66 | 4 | 81 | 2 | 96 | 3 |
| 7 | 1 | 22 | 4 | 37 | 4 | 52 | 1 | 67 | 4 | 82 | 2 | 97 | 1 |
| 8 | 3 | 23 | 1 | 38 | 4 | 53 | 1 | 68 | 3 | 83 | 4 | 98 | 3 |
| 9 | 1 | 24 | 2 | 39 | 3 | 54 | 4 | 69 | 1 | 84 | 4 | 99 | 4 |
| 10 | 1 | 25 | 1 | 40 | 2 | 55 | 4 | 70 | # | 85 | 3 | 100 | # |
| 11 | 3 | 26 | 2 | 41 | 3 | 56 | 3 | 71 | 3 | 86 | 1 | | |
| 12 | 3 | 27 | 4 | 42 | 2 | 57 | 3 | 72 | 2 | 87 | 4 | | |
| 13 | # | 28 | 3 | 43 | 2 | 58 | 3 | 73 | 1 | 88 | 3 | | |
| 14 | 2 | 29 | 3 | 44 | 3 | 59 | 3 | 74 | 4 | 89 | 2 | | |
| 15 | 2 | 30 | 2 | 45 | 1 | 60 | 1 | 75 | 4 | 90 | 1 | | |

THE TM
YASH ACADEMY